राज्य सेवा (मुख्य) परीक्षा - २०२१ दिनांक ०७ मे, २०२२

B15

2021

607001

# भाषा पेपर क्र. – 1 / LANGUAGE PAPER – 1

**दर्जा : उच्च माध्यमिक शालांत परीक्षा**
**Standard : H.S.C.**

**एकूण गुण : 100**
**Maximum Marks : 100**

**प्रश्नपत्रिकेचे स्वरूप : पारंपरिक**
**Nature of Paper : Conventional type**

**कालावधी : 3 तास**
**Time allowed : 3 hours**

---

*सूचना* / ***Note :***

(i) *उमेदवाराने **भाग – 1** मराठी व **भाग – 2** इंग्रजीकरिता **दोन स्वतंत्र उत्तर-पुस्तिका** वापरावी.*
*Candidates should use **two separate answer-books** for **Part – 1** Marathi and **Part – 2** English.*

(ii) ***सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.*
***All** questions are **compulsory.***

(iii) *प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.*
*Figure to the RIGHT indicates marks of the respective question.*

(iv) *तर्कसंगत, नेमक्या आणि परिणामकारक लिखाणास यथोचित गुण देण्यात येतील.*
*Credit will be given to correct spelling, punctuation, good handwriting and neatness.*

(v) *उत्तर-पुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने बैठक क्रमांक, स्वत:चे किंवा इतरांचे नाव, पत्ता किंवा आपली ओळख देणारे चिन्ह नमूद करु नये, अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.*
*Candidates should not write roll number, any name (including his/her own), signature, address or any indication of his/her identity anywhere inside the answer-book otherwise he/she will be penalised.*

(vi) *उमेदवाराने प्रत्येक प्रश्नातील उपप्रश्न यांची उत्तरे एकत्र सोडवावयाची आहेत. उत्तराचा काही भाग किंवा एक उपप्रश्न एकीकडे व दुसरा दुसरीकडे (काही पृष्ठे सोडून वा अन्य प्रश्न सोडवून तद्नंतर) सोडवल्यास दुसरा भाग / उपप्रश्न दुर्लक्षित केला जाईल.*
*Candidates are expected to answer all the sub-questions of a question together. If part of answer or sub-question of a question is attempted elsewhere (after leaving a few pages or after attempting another question) the later shall be overlooked.*

(vii) *उमेदवाराने **भाग – 1** मराठी या उत्तर-पुस्तिकेत **भाग – 2** इंग्रजीचा प्रश्न सोडवू नये, तसेच **भाग – 2** चे उत्तर-पत्रिकेत **भाग – 1** (मराठी) चे प्रश्न सोडवू नयेत. सोडविल्यास तो दुर्लक्षित केला जाईल.*
*Candidates should not answer **Part – 1** Marathi Question in **Part – 2** English answer-book and vice-versa, otherwise it will be overlooked.*

P.T.O.

## भाग – 1 : मराठी (अनिवार्य) 50

1. खालीलपैकी *एका* विषयावर 400 शब्दात निबंध लिहा : 25

(a) भारतीय स्वातंत्र्याची 75 वर्षे : काय कमवले ? काय गमवले ?

(b) श्रोते हो ! मी रेडिओ बोलतोय....

---

2. इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : 15

If you want to leave your footprints on the sands of time, do not drag your feet.

Anyone who has taken up the responsibility to lead a team can be successful only if he is sufficiently independent.

This is perhaps also the path to individual satisfaction in life, for freedom with responsibility is the only sound basis for personal happiness. What can one do to strengthen personal freedom ? I would like to share with you two techniques I adopt in this regard.

First, by building your own education and skills. Knowledge is a tangible asset, quite often the most important tool in your work. The more up-to-date the knowledge you possess, the freer you are. A leader can only be free to lead his team if he keeps abreast of all that is happening around him in real time. To lead, in a way, is to engage in continuing education.

The second way is to develop a passion for personal responsibility. Be active ! Take on responsibility ! Work for the things you believe in.

Prof. Dhawan was a true captain of the ISRO ship — a commander, navigator, housekeeper, all rolled into one. I had the privilege of spending a great deal of time with Prof. Dhawan. He had an unusual combination of degrees — a B.Sc. in Mathematics and Physics, an M.A. in English Literature, B.E. in Mechanical Engineering, M.S. in Aeronautical Engineering followed by a Ph.D. in Aeronautics and Mathematics from the California Institute of Technology in USA.

Intellectual debates with him were very stimulating and could always mentally energize me and my team members. I found him full of optimism and compassion.

---

3. पुढील उताऱ्याचे $\frac{1}{3}$ शब्दात सारांश-लेखन करा आणि त्याला योग्य असे शीर्षक द्या : *10*

विद्यार्जनाचे मर्म त्यात गोडी निर्माण होणे हे आहे. एस.एस.सी. पर्यंतच्या शिक्षणाने अशी गोडी निर्माण झाली पाहिजे, परंतु कशीबशी एकदा परीक्षा पास होणाऱ्यांना कोणत्याच विषयाची गोडी लागत नाही. केवळ परीक्षा पास होण्यासाठी अभ्यास करणे आणि विषय आवडतो म्हणून अभ्यास करणे यात फरक आहे. दुर्दैवाने फार जणांचा कल परीक्षेपुरता अभ्यास करण्याकडे असतो. हे बरोबर नाही. या हेतूने तुम्ही महाविद्यालयात आला असाल तर तुम्हाला फारसा फायदा होणार नाही. विषयाची गोडी लागून तुम्ही अभ्यास केलात, तरच स्वत:चे भले करून घेऊ शकाल. महाविद्यालय हे ज्ञान संपादनाचे ठिकाण आहे.

पहिल्या पदवी परीक्षेपर्यंतच्या काळात आपल्या विषयापुरते पुरेसे ज्ञान तुम्हाला मिळाले पाहिजे. लक्षात घ्या की, केवळ दिले जाणारे ज्ञान नाही ते 'मिळविलेले' ही आहे. प्राध्यापकांचे काम मार्गदर्शनाचे, मदत करण्याचे. पण मुख्य काम आहे ते तुमचे. तुम्ही वाचले पाहिजे, टिप्पणे काढली पाहिजेत. मनन केले पाहिजे, लिहून काढले पाहिजे, आणि न समजलेला भाग समजावून घेतला पाहिजे. शाळेत वाचण्याची आणि अभ्यास करण्याची सवय लागली नसेल तर ती आधी लावून घ्या. अगदी पहिल्या दिवसापासून तसे करा.

महाविद्यालयात विषयवार मंडळे असतात. त्या सर्वांची माहिती घ्या. महाविद्यालयाचा विद्यार्थी म्हणून तेथील जीवनात सहभागी होणे तुमचे कर्तव्य आहे. महाविद्यालयाचा विद्यार्थी म्हणून तेथे होणाऱ्या विविध गोष्टीत रस घेतला पाहिजे. वादविवाद मंडळ, कलामंडळ, वाङ्मय मंडळ, क्रीडा विभाग, नियतकालिक, एन.एस.एस., एन.सी.सी. यापैकी एकात तरी सहभाग घेतला पाहिजे.

महाविद्यालयाच्या पदवीपर्यंतच्या काळात आंतर्बाह्य सुधारणा झाली पाहिजे. म्हणून प्रथम व्यक्तिमत्व कमवण्याकडे लक्ष द्या. चांगल्या सवयी लावून घ्या. महाविद्यालयीन युवकाला एक दर्जा आहे त्याप्रमाणे त्याचे वागणे, बोलणे, चालणे असले पाहिजे, आणि त्याच्या वागण्यात भारदस्तपणा आला पाहिजे. तुमच्या आचार-विचारात आणि एकंदर व्यवहारात उच्च शिक्षणाची झलक दिसली पाहिजे.

## PART – 2 : ENGLISH (COMPULSORY) 50

1. Write an essay on any ***one*** of the following topics in about 400 words : *25*

(a) Importance of Peace in Human Life

(b) Mobile : An Escape from Reality

2. Translate the following passage into English : *15*

प्रवासाच मला भयंकर वेड आहे. गावाविषयी मला प्रचंड प्रेम आहे. बऱ्याचदा दोन्हींचा मेळ जमत नाही. तरी आयुष्य पुढे जात राहत. काहीवेळा मनाला पीळ पाडणाऱ्या घटना घडतात, जवळची माणस दुखावली जातात, कधी गैर समजुतीच जाळ पसरत, तरीही जिप्सीला नवनवीन प्रदेश पायाखालून घालायचा असतो. प्रतिकूल परिस्थितीतही देशविदेशभर भ्रमण करणारे अनेक महापुरुष मला सदैव प्रेरणादायक ठरले. यातले बरेच लोक आपल्या सगळ्यांच्या इतक्या चांगल्या परिचयाचे आहेत की त्यांच्या या फिरण्याच आपल्याला कधी महत्वच वाटल नाही. हे महापुरुष देशविदेश फिरले. कारण ते कधीच कोणत्याही विशिष्ट स्थळांना, व्यक्तींना किंवा गावांना मर्यादित अर्थाने बांधिल नव्हते. अर्थात विनाकारण त्यांनी भटकंती केली अस नव्हे. विशिष्ट स्थळकाळ व्यक्ती यांच्या पलीकडे नेणारं प्रयोजन त्यांना सापडल होत. काही सत्याच्या शोधात बाहेर पडले, काही विशिष्ट संदेशाच्या प्रसारार्थ बाहेर पडले, काही शिकायला तर काही व्यापारानिमित्त. प्रत्येकजण आपापल्या परीने अर्थपूर्ण जीवन जगत राहिला.

बुद्ध आपल्या बायकापोरांना सोडून गेला हे खर पण त्याच्या मनात त्यांच्याविषयी मायाप्रेम नव्हत हे काही खर नव्हे. संपूर्ण जगावर प्रेम करणारा गौतम बुद्ध स्वत:च्या बायकोमुलां विषयी संताप आणि तिरस्काराने भरला असण कदापि शक्य नाही. तरीही रात्रीच्या शांत वातावरणात तो त्याची प्रियतमा पत्नी व मुलगा राहुल यांना त्यांची झोपमोड होऊ न देता हळूहळू राजगृहातून बाहेर पडला आणि एका नव्या प्रवासाला सुरुवात झाली. बुद्ध असा रात्री न सांगता सवरता का गेला याच साध कारण असाव, दिवसा सगळ्यांदेखत बायकामुलांना सोडण त्याला अशक्य झाल असत. पत्नीच्या डोळ्यातल पाणी आणि पुत्राच्या चेहऱ्यावरचे भाव त्याचे पाश बनले असते आणि कदाचित त्यांच्या आगळ्या वेगळ्या प्रवासाचा सुरवाती आधीच शेवट झाला असता. घरदार सोडण्यामाग तिरस्कार आणि द्वेषापेक्षा सार्वत्रिक प्रेम पाशाची भावना ही महापुरुषांची अंत:प्रेरणा असणार !

3. Write a precis of the following passage in about $\frac{1}{3}^{rd}$ of its original length and suggest a suitable title : *10*

Water is an integral part of land/soil productivity base. Its misuse can cause soil degradation and soil erosion. Water management is thus necessary for crop yields and other activities. Primary channel flow originates in upper catchment and these watersheds are very important for the future. Therefore, health of watersheds is most important.

Availability of watersheds is the most important factor and is related to erosion, siltation, loss of cover and productivity. In India, floods bring much havoc causing loss of life and property each year. Due to floods, the plants have become silted with mud and sand thus affecting the cultivable land areas. Extinction of civilization in some coastal areas is mainly due to such natural calamities as floods. The National Commission on Floods has calculated that the land area prone to floods has doubled from 20 million hectares in 1971 to 40 million hectares in 1980. The worst suffering states are Assam, Bihar, Odisha, U.P. and West Bengal. These aspects are to be given serious thought to save further destruction of mankind.

SEAL SEAL SEAL